# लहान मुलांच्या शाळांसाठी



प्रा. रमेश पानसे

# भूमिका

ग्राममंगल ही संस्था बालशिक्षणाच्या आणि प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रात गेली अनेक वर्षे काम करीत आहे. त्यातही, ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भागात शिक्षणविषयक नवनवीन प्रयोग करीत आहे. शिक्षणविषयक यशस्वी पद्धतींचा प्रसार होण्यासाठी प्रशिक्षण वर्गही चालवीत आहे. ताराबाई मोडक आणि अनुताई वाघ यांच्या शैक्षणिक संकल्पनांचा वारसा घेऊनच ग्राममंगलचे शिक्षणविषयक संशोधन व विकासाचे कार्य चालू आहे. बालशिक्षणविषयक समाज प्रबोधनाच्या कार्यात, आपल्या परीने काही करावयाचे ग्राममंगलने ठरविले आहे. त्यासाठी

१. लहान मुलांच्या पालकांसाठी

२. लहान मुलांच्या शिक्षिकांसाठी

३. लहान मुलांच्या शाळांसाठी

अशा तीन पुस्तिका ग्राममंगलने प्रकाशित केल्या आहेत. त्यातली ही तिसरी पुस्तिका.

पालकांचे, शिक्षकांचे आणि शाळा व्यवस्थापनाचे प्रबोधन हीच बालकांच्या शिक्षणाची पहिली पायरी आहे. आपल्या मुलांच्या वाढीमध्ये या सर्व घटकांना, अधिक परिणामकारक काम करता यावे आणि मुले वाढविण्याची प्रक्रिया त्यांना आनंददायक व्हावी हाच या पुस्तिकांमागचा हेतू आहे.

ग्राममंगल
नोव्हेंबर २००५

रमेश पानसे
विश्वस्त – ग्राममंगल

# अनुक्रमणिका


१. चांगल्या शिक्षणाकडे नेणारे नवसंशोधन

२. नवशिक्षणाची नवक्रांती

३. रचनात्मक शिक्षण

४. मेंदूआधारित शिक्षण

५. मेंदूसंशोधनाचे शिक्षणविषयक दहा निष्कर्ष

६. अनुभवाधारित शिक्षण

७. मानवी अनुभवांचे व्यापक क्षेत्र

८. बहुविध बुद्धिमत्तांचे अस्तित्व

९. नवशिक्षणासाठी शाळाव्यवस्था

१०. शाळेचे वातावरण

# लहान मुलांच्या शाळांसाठी

ग्राममंगल संस्थेने यापूर्वी, १. लहान मुलांच्या पालकांसाठी आणि २. लहान मुलांच्या शिक्षिकांसाठी अशी दोन, खिशात ठेवता येण्यासारखी छोटेखानी पुस्तके प्रसिद्ध केली आहेत. त्याच मालिकेतील हे तिसरे पुस्तक 'लहान मुलांच्या शाळांसाठी'.

ही तीनही पुस्तके स्वतंत्रपणे त्या त्या गटांसाठी महत्त्वाची आहेतच, पण, तीनही पुस्तके एकत्रितपणे शिक्षणक्षेत्राशी संबंधित अशा सर्वांनीच वाचायला हवीत. मुलांकडे नि त्यांच्या शिक्षणाकडे पाहण्याची एक नवीन दृष्टी प्राप्त व्हावी; अलीकडच्या काळातील शास्त्रीय नवसंशोधनाची ओळख व्हावी, या नवविचारांनाही स्वत:चा दीर्घ इतिहास आहे  हे सर्वांना कळावे, नवशिक्षणाचे एक प्रारूप डोळ्यांसमोर यावे, हे या पुस्तक मालिकांच्या लेखनामागील हेतू आहेत.

आज शाळांमधून जात असलेल्या सर्व मुलांना आपले सारे आयुष्य एकविसाव्या शतकात घालवायचे आहे. तंत्रज्ञान, शास्त्रज्ञान आणि तत्त्वज्ञान या तीनही बाबतींत, क्रांती करणारे असे हे शतक असणार आहे. जीवनाला विलक्षण वेग येणार आहे; आणि शाळांनी कितीही तयारी करून दिली, ज्ञानाची कितीही मोठी गाठोडी बांधून दिली, तरीही ती त्यांच्या आयुष्याला पुरणार नाहीत. एक काळ असा होता,की वयाच्या विशी-पंचविशीपर्यंत मिळविलेल्या ज्ञानाची शिदोरी आयुष्यभराची बेगमी करीत असे. पण ते दिवस आता उरले नाहीत. ज्ञानाची विणलेली वस्त्रे विद्यार्थ्यांना देऊन भागणार नाही. त्यांच्या वाढत्या अंगाला ती तोकडीच पडणार आहेत. त्यामुळे गरज आहे ती त्यांना ज्ञानाची वस्त्रे विणण्याचेच शिक्षण देण्याची. एका अर्थाने हे शिक्षण देणे अधिक सोपे आहे. कारण, उपजतच मुले आपल्या ज्ञानाची रचना आपली आपणच करत असतात. आपण मात्र आज त्यांची ही क्षमता शाळाशाळांतून भस्मसात करतो आहोत आणि जीवनाचे प्रश्न सोडविण्यासाठी निरुपयोगी करून शाळांबाहेर ढकलतो आहोत. शाळा चालविणाऱ्यांनी या पठडीबद्ध, निरुपयोगी शिक्षणाच्या मानसिकतेतून आपली मुक्तता करून घेण्याची गरज आहे.

ही पुस्तिका याची जाणीव देण्याची जबाबदारी घेत आहे.

प्रा. रमेश पानसे

# चांगल्या शिक्षणाकडे नेणारे नवसंशोधन

- मुलांचे शिक्षण चांगले कसे करता येईल, याबाबत खूप नवीन विचार जगात पुढे आले आहेत.
- गेल्या पन्नास वर्षात, मानसशास्त्रातील संशोधनाने शिक्षणाचे विचारक्षेत्र फार ढवळून निघाले आहे.
- गेल्या वीस वर्षांत मज्जाशास्त्रांतील आणि मज्जामानसशास्त्रातील संशोधनाने शिक्षणशास्त्र नव्या सैद्धांतिक पायावर उभे राहत आहे.
- साऱ्या विकसित जगामध्ये शिक्षणाकडे 'रचनात्मक दृष्टिकोना'तून पाहिले जात आहे. आपल्या शाळांतून स्थिर झालेला 'वर्तनवादी दृष्टिकोन' कालबाह्य मानला जात आहे.

- बुद्धिमत्ता ही एक नाही तर अनेक आहेत आणि प्रत्येक जणच कोणत्या ना कोणत्या बाबतीत बुद्धिमान असतो, हुशार असतो, चलाख असतो; असे सिद्ध करणारे संशोधनही आता जगापुढे आले आहे.
- अत्याधुनिक संशोधनावर आधारित असा 'मेंदू आधारित शिक्षणा' चा नवा ढाचा, विकसित राष्ट्रांमधून वेगाने स्वीकारला जात आहे.
- शिक्षणातील या नवविचारांवर आधारित अशा अनेक प्रयोगशील शाळा खुद्द शास्त्रज्ञांनीच उभ्या केल्या आहेत.
- अलीकडच्या काळातील नवतंत्रज्ञानाने शिक्षणक्षेत्रात नवक्रांतीचे युग सुरु केले आहे.
- आपल्यापुढे आता एकच पर्याय आहे. शिक्षणातील नवक्रांती स्वीकारणे अथवा जगात सर्वस्वी मागे राहणे.

# नवशिक्षणाची नवक्रांती

- शिक्षणातील नवक्रांतीची सुरुवात, संस्था-चालकांना आपल्यापासून करता येईल.
- काही थोड्या मुलांचे शिक्षण जरी आपल्या हातात असेल, तरी आपण शिक्षणातील नवविचारांना आपलेसे केले पाहिजे.
- नव्या शिक्षणाचा लाभ नव्या पिढीला मिळवून दिला पाहिजे.
- शिक्षण हे प्रवाही असते; हे सत्य आपण स्वीकारून, नवज्ञानाच्या उगवत्या सूर्याला सामोरे गेले पाहिजे.
- आपल्या शिक्षणसंस्थेत चैतन्य यायचे असेल तर आपण सर्वांनीच शिक्षणातील नवविचारांनी न्हाऊन निघाले पाहिजे.
- विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शाळेचे स्वरूप प्रयोगशील झाले पाहिजे.

- मुलांचे बौद्धिक पोषण, जुन्या पठडीबद्ध शिक्षणविचारांच्या शिळ्या अन्नावर करण्यापेक्षा त्यांना भाविकालाभिमुख करणारे नवशिक्षणाचे ताजे सकस अन्न दिले पाहिजे.
- शिक्षण हे विद्यार्थ्यांसाठी, शिक्षिकांसाठी, पालकांसाठी आणि संस्थाचालकांसाठी आनंददायी आणि चैतन्यमयी करणे सहज शक्य असते, यावर विश्वास ठेवला पाहिजे.
- शिक्षणात बारीकसारीक सुधारणा करण्याचा विचार आपण सोडून दिला पाहिजे. शिक्षणात नवी दृष्टी अंगिकारून मूलतः परिवर्तन केले पाहिजे. अन्यथा आपण एक मागासलेल्यांचे राष्ट्र म्हणून ओळखले जाऊ.
- आपण जगाच्या मागे राहण्याचे नाकारून जगाबरोबर पुढे जाणे स्वीकारू या.

# रचनात्मक शिक्षण

- रचनात्मक शिक्षणाची खालील तत्त्वे आपण लक्षात घेऊ या; त्यांवर चिंतन करू या आणि विचारांती ती अंगिकारू या; अंमलात आणू या.

- जन्मल्यापासूनच मूल आपल्या हालचालींद्वारे, विविध कर्मेंद्रिये आणि ज्ञानेंद्रिये यांचा उपयोग करून, आपले आपणच शिकत असते, असे आकलनवादी मानसशास्त्राने दाखवून दिले आहे.

- मुले, आपल्या अंतर्गत प्रेरणेने, अत्यंत आनंदाने आणि स्वयंप्रयत्नाने जग आकळून घेत असतात आणि या प्रक्रियेतून शिकत असतात.

- शिकणे, सतत शिकत राहणे ही माणसाची नैसर्गिक प्रवृती असते; आपण तिचा आदर राखायचा असतो. विद्यार्थ्यांच्या या नैसर्गिक प्रवृतीला भरपूर संधी पुरवायच्या असतात. अशा संधी देते ती शाळा होय.

- मूल जित्या- जागत्या अनुभवांच्या द्वारे आपल्या स्वत:च्या ज्ञानाची रचना करीत जाते. त्यामुळे मुलांना रोजच भरगच्च अनुभव उपलब्ध करून द्यायचे असतात. असे विविधांगी अनुभव पुरविते तिला शाळा म्हणतात.

- मूल नैसर्गिकरित्या तर शिकतेच, पण ते निसर्गातून शिकत असते, हेही महत्त्वाचे. त्यामुळे मुलांना वर्गांच्या भिंतीबाहेर काढून निसर्गाशी नैसर्गिक जवळीक साधण्याच्या संधी द्यायला हव्यात.

- प्रत्येक मूल आपले आपण, म्हणजे स्वतंत्रपणे, शिकत असते. म्हणजे सर्व मुले एकाच वेळी, एकच विषय, एकाच पद्धतीने, एकाच प्रमाणात, एकाच प्रयत्नांत शिकत नसतात. शिक्षण हे व्यक्तिगतच असते. शालेय व्यवस्था व्यक्तिगत शिक्षणाला साजेशी अशी करावी लागते.

- शाळा ही मुलांना शिकण्यासाठी असते, त्यांना शिकविण्यासाठी नसते.

# मेंदू आधारित शिक्षण

- मेंदू हा 'शिकण्याचा' अवयव आहे हे आजच्या मेंदू संशोधनाने सिद्ध केले आहे. आत्तापर्यंत अज्ञात असलेला मेंदू आता आपल्याला उघड करतो आहे.
- जन्मपूर्व अवस्थेत मुलाचा मेंदू पूर्णपणे तयार झालेला नसतो. त्यामुळेच मूल जन्मल्यानंतर बराच काळ अनेक गोष्टी करू शकत नाही; ते परावलंबी असते.
- मुले वयात येईपर्यंतच्या काळात त्यांच्या मेंदूमधील पेशींची परस्परांशी जुळणी होण्याचे कार्य चालू असते. याला मेंदू घडणीचा काळ असे म्हणतात.
- मेंदूघडणीच्या काळात, मेंदूघडणीला बाधक ठरणाऱ्या बक्षिसे, शिक्षा, स्पर्धा, गृहपाठ, परीक्षा, शिस्त अशा गोष्टी शिक्षणात आणता कामा नयेत. त्याने मुलांच्या भावी आयुष्यावर आघात होतात.

- मेंदू घडणीच्या काळात, मेंदू घडणीला पूरक ठरणाऱ्या स्वयंशिक्षण, सहजशिक्षण, स्वयंशिस्त,स्वावलंबन, सहकारी शिक्षण अशा गार्ष्टींनाच शिक्षणात स्थान दिले पाहिजे. मुलांचे भावी आयुष्य सुखद आणि प्रगल्भ करण्याचा हाच एक मार्ग आहे.
- मेंदू हा केवळ आपल्या शरीराचाच नव्हे तर आपल्या भावभावनांचा, आपल्या बुध्दिमत्तेचा आणि आपल्या सामाजिक वर्तनाचाही कार्यकारी संचालक असतो. त्यामुळे प्रौढपूर्व वयातील मेंदूची जोपासना करणे, व त्याची सर्वांगीण कृतिक्षमता विकसित करणे हेच शिक्षणाचे प्रधान कार्य आहे.
- आपण मुलांच्या मेंदूची काळजी घेतली तर मेंदू मुलांची काळजी घेईल.

# मेंदू संशोधनाचे
# शिक्षणविषयक दहा निष्कर्ष

- मेंदू ही एक गुंतागुंतीची व्यवस्था आहे. त्यामधील वेगवेगळी कार्ये करणारी केंद्रे ही परस्परसंबंधातून एकात्मतेने कामे करीत असतात.
- घेतलेल्या अनुभवांद्वारे आणि आकृतीबंधाद्वारे, अर्थपूर्ण रचना करण्यासाठी मेंदूचा अंगभूत असा शोध चाललेला असतो.
- मेंदूच्या कार्यकारी रचनेत अनुभवान्ती बदल होऊ शकतो.
- दोन भिन्न स्मरणव्यवस्थांचा वापर मेंदू करीत असतो; एक अल्पकालीन व एक दिर्घकालीन.
- अगोदरच्या ज्ञानाला चेतना देण्यापासून नवीन ज्ञानारचनेची प्रक्रिया सुरू होत असते.

- अनुभव घेण्याच्या विविध तऱ्हांचा वापर करून आणि सांकेतिक पध्दतींचा उपयोग करून स्मरणशक्ती पर्याप्त करता येते.
- माणसाची शिकण्याची प्रक्रिया ही, प्रत्यक्ष वस्तू आणि कल्पना हाताळण्याने प्रभावी होणारी अशी रचनात्मक प्रक्रिया आहे.
- माणसाच्या शिकण्याचे स्वरूप आणि दर्जा आणि स्मरणप्रक्रिया ही त्याच्या मानसिक स्थितीवर अवलंबून आहे.
- माणसाचे शिकणे ही सामाजिक व सांस्कृतिक घटकांनी प्रभावित होणारी प्रक्रिया आहे.
- शिकण्याच्या प्रक्रियेत, माणसाला अधूनमधून विरंगुळ्याची आवश्यकता असते.

# अनुभवाधारित शिक्षण

- अनुभवांद्वारे संपादन केलेले ज्ञान नेमकेपणाने घेतले जाते, परिपूर्णतेने घेतले जाते, मुख्य म्हणजे ते वेगाने संपादन केले जाते आणि तेच कायमचे टिकते.
- लहान मुलांचे कान ते गर्भाशयात असतानाच तयार होत असतात. त्यामुळे जन्मल्यापासूनच 'ऐकून' शिकता येते. आपण खूप गोष्टी, विशेषत: मोठ्या वयात ऐकून आत्मसात करू शकतो.
- जन्मल्यानंतर थोड्याच अवधीत मुलाची नजर स्थिर होऊ लागते आणि मग ते अनेक दृष्ये झेलू लागते. 'पाहून शिकणे' ही शिकण्याची एक प्रभावी पद्धती आहे.

- काही वस्तूंबाबतचे ज्ञान आपण 'चवीने' घेतो तर काही बाबींचे ज्ञान आपल्याला 'वास घेतल्याने' होत असते.
- 'स्पर्श करून' ज्ञान मिळविणे हे लहान वयात केवळ उपयुक्तच नसते तर ते मेंदूला अधिक पक्के करणारेही शिक्षण असते.
- सर्वच वयात 'करून शिकणे' ही शिकण्याची सर्वांत प्रभावी पद्धत असते. लहान वयात तर ती एकमेव पद्धत मानली पाहिजे.
- आयुष्यात शिकून काही प्रभावी काम करायचे असेल तर बालपणी करून शिकले पाहिजे.

# मानवी अनुभवांचे व्यापक क्षेत्र

- मानवी अनुभवांचे क्षेत्र खूप व्यापक असते. इंद्रियांव्यतिरिक्त प्राप्त झालेल्या अन्य क्षमताही माणसाचे शिकणे प्रभावी करीत असतात.
- कल्पकतेची देणगी हे मानवाचे एक खास वैशिष्ट्य आहे. 'कल्पनाशक्तीचा वापर करून' शिकण्याची सवय लहानपणापासून लावता येते.
- स्वतंत्र विचारशक्ती हेही माणसाचे एक व्यवच्छेदक लक्षण आहे. स्वतंत्र विचारशक्तीचा वापर करतच तिची जोपासना करता येते. मुले विचाराचे स्वातंत्र्य टिकवतील हे पाहणे शाळांचे कर्तव्य ठरते.
- जीवनातील प्रश्न सोडविण्याची ताकद विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे म्हणजे शिक्षण होय.

- भावनाशीलता हे सस्तन प्राण्यांचे एक प्रधान लक्षण आहे. माणसात भावनाशीलतेचे विकसित रूप पाहावयास मिळते. सामाजिक जीवनाचे ते एक महत्त्वाचे अंग आहे.
- माणसाला एक खास इंद्रिय अमूर्त स्वरूपात प्राप्त झालेले असते. ते म्हणजे 'जाणिवे' चे इंद्रिय. माणसाच्या जाणिवा प्रगल्भ करणे हे शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य आहे.
- 'अंतर्ज्ञान' हे ही तार्किकतेच्या पलीकडे जाणारे एक क्षमता साधन माणसास उपलब्ध होऊ शकते. ते शिकण्याचे, जाणून घेण्याचे एक साधन असू शकते.
- शाळांतील 'अभ्यासक्रम' या क्षमतांच्या विकासाच्या दृष्टीने वळविता येतो.

# बहुविध बुद्धिमत्तांचे अस्तित्व

- अलीकडच्या बुद्धिमत्तेच्या क्षेत्रातील संशोधनाने, आपले काही पूर्वसमज दुरुस्त केले आहेत. आता असे लक्षात आले आहे की, बुद्धिमत्ता ही सर्वसामान्य अशी एकच क्षमता नाही. बुद्धिमत्ता अनेक आहेत; आणि प्रत्येकालाच या बुद्धिमत्तांचा एका विशिष्ट पट उपजतच लाभलेला असतो.
- बुद्धिमत्तेत अनुवंशिकतेचा वाटा फार अल्प असतो. बुद्धिमत्ता वाढू शकते. बुध्यांक ही एक अतिशय मर्यादित अशी संकल्पना असून तिने सर्वांच्याच बध्दीचे मोजमाप करता येत नाही. त्यावरून हुशार किंवा ढ ठरविता येत नाही.
- लहान वयातच बुद्धिमत्तांच्या वाढीला, नियोजनपूर्वक वेग देता येतो.

- वेगवेगळ्या बुद्धिमतांची स्वतंत्र केंद्रे मेंदूमध्ये आढळतात. एखाद्याला एखादी बुद्धिमत्ता तीव्रतेने उपलब्ध झालेली असते तर दुसऱ्याला दुसरीच कोणती तरी. त्यामुळे त्या त्या व्यक्तीचे स्वत:चे असे बुद्धिमत्तेचे विशिष्ट क्षेत्र असते असे मानता येते.
- हॉवर्ड गार्डनर यांनी खालीलपमाणे आठ बुद्धिमत्ता सांगितल्या आहेत; मुलांच्या बुद्धिमत्ता ओळखून त्या अंगाने शिक्षणाची रचना करता येते.

भाषिक बुद्धिमत्ता :

शब्द सामर्थ्य , भाषा सामर्थ्य , वक्तृत्व , वाङ्मयनिर्मिती, विविध भाषाचे आकलन

तार्किक – गणिती बुद्धिमत्ता :

संख्यासामर्थ्य , तार्किकता, वैज्ञानिकता, विश्लेषणशक्ती.

सांगितिक बुद्धिमत्ता :

संगीताची समज व आवड, गायन, वादन, रागांचे चलन–वलन समजणे

शरीर–स्नायुविषयक बुद्धिमत्ता :

शरीराचा कुशलतेने वापर करून नृत्य करणे, विविध खेळांत वाकबगार होणे, शरीरस्नायूंवर नियंत्रण

अवकाशीय बुद्धिमत्ता :

फिल्म्स – व्हिडियो तयार करणे , वास्तुशास्त्र, शल्यविशारद यांचे कौशल्य, दिशांचे अंदाज, आलेख करता येणे

निसर्गविषयक बुद्धिमत्ता :

निसर्गाची आवड, झाडे –पशु – पक्षी यांच्या अभ्यासात रस, बागा– पर्यावरण यांच्या अभ्यासात गती

व्यक्तीअंतर्गत बुद्धिमत्ता :

स्वत:ला ओळखणे, स्वनियंत्रण, स्वत:च्या भावभावना ओळखणे, त्यांवर नियंत्रण ठेवणे, आत्मशोधाची आवड असणे.

आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता :

दुसऱ्या व्यक्तींच्या भावभावना, हेतू, इच्छा, यांची समज लोकांच्यात मिसळण्याची आवड, नेतृत्वाची कला मुलांना हुशार करण्याच्या फंदात पडू नका. मुले चलाख कशी होतील ते पाहा.

- नवेशिक्षण स्वीकारले तर जुनी शाळाव्यवस्था तपासून पाहावी लागेल. जे योग्य ते राखतानाच जे जे विद्यार्थ्यांना ताण निर्माण करणारे, निरर्थक, निरुपयोगी व अयोग्य असे असेल ते ते सरळपणे दूर करण्याचे धैर्य दाखविले पाहिजे.
- मुलांचे हालचालींचे स्वातंत्र्य राखणे ही मेंदूआधारित शिक्षणाची एक अट आहे. त्यामुळे मुलांना बुट-मोज्यांत आणि बाकांत अडकवून ठेवणे हे मुलांच्या शिक्षणात अडथळा निर्माण करीत असते. मुलांना मोकळेपणाने कुठेही कसेही बसता आले पाहिजे. वर्गखोल्यांमधून इकडून तिकडे मुक्तपणे वावरता आले पाहिजे.
- आज मुलांना मुक्तता द्या. उद्याला ते जबाबदारीने वागतील.

- मुलांना बोलण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. शिक्षकाने सर्वथा बोलणे आणि मुलांनी गप्प बसून ऐकणे ही शिक्षणाची मेंदूविरोधी पद्धती आहे. मुलांना एकमेकांशी, शिक्षकांशी मुक्तपणे संवाद साधता आला पाहिजे. आपली अभिव्यक्ती शब्दांनी करू दिली पाहिजे.
- मुलांना चुका करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. मुले आव्हान घेऊन जेव्हा शिकत असतात तेव्हा ती प्रश्न सोडविण्याची ताकत प्राप्त करीत असतात. चुकीचे पर्याय वापरून पाहत असतात. योग्य मार्गाने जाताना होणाऱ्या चुका हे मैलाचे दगड असतात, त्यामुळे चुकांच्या आधारे मूल्यमापन करणे योग्य ठरत नाही.

- मुलांना विश्रांतीचे, विरंगुळ्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. प्रत्येक मुलाची शारीरिक प्रकृती, भावनिक स्थिती आणि विशिष्ट वेळची बौद्धिक तयारी वेगळी असते. अशा वेळेस त्याच्या गरजांनुसार त्याच्या मेंदूचा थकवा घालविण्यासाठी विश्रांतीची किंवा विरंगुळ्याची संधी त्याला मिळावी लागते.
- शाळामधील भिंती मुलांना वापरण्यायोग्य केल्या पाहिजेत. तेथे मुलांचे स्वनिर्मित साहित्य लावले पाहिजे. फळे मुलांसाठी असावेत, शिक्षकांसाठी नकोत. शाळा विद्यार्थीकेंद्री असली पाहिजे. शिक्षककेंद्री नको. विद्यार्थ्यांची नागरिकत्वाची आणि पर्यावरण प्रेमाची ज्योत येथेच लागली पाहिजे.

# शाळेचे वातावरण

- मेंदूआधारित शिक्षणासाठी पूरक असे वातावरण शाळेने उपलब्ध करून द्यावयाचे असते. मुले सामाजिक वातावरणातून शिकत असतात. त्यासाठी सैल, मुक्त वातावरणाची गरज असते. अति शिस्तबद्ध हालचाली, बंदिस्त वातावरण मुलांना चांगले शिकू देत नाही. भयपूर्ण वातावरण मुलांना बौद्धिक कामापासून परावृत्त करीत असते. त्यामुळे शाळेत वातावरण प्रसन्न असले पाहिजे.
- प्रसन्न वातावरणात, बुध्दी-स्थिरतेने काम करते, मन एकाग्र होते आणि मुले अभ्यासात समरस होतात.

- शाळेचे वातावरण प्रसन्न व्हावे यासाठी, इमारत व भिंत, जमीन व खिडक्या साऱ्यांकडेच सौंदर्याच्या दृष्टिने पाहण्याची गरज आहे. स्वच्छ व सुंदर शालेय परिसर मुलांची भावनिक स्थिरता साधत असतो. बेगडी, तथाकथित सुविचारांची जागा छान छान विनोदांना द्यावी. माणसाचे मन प्रसन्न करण्याचे विनोद हे एक प्रभावी साधन आहे.
- खेळांना, मानवी जीवनात आणि त्यातही शालेय विद्यार्थ्यांच्या जीवनात अनिवार्य असे स्थान आहे. शाळेत अभ्यासाइतकेच खेळांचे स्थान असले पाहिजे. खेळ सर्वांसाठी असावेत; मोजक्या मुलांच्या स्पर्धांसाठी असू नयेत.

- शिक्षक–विद्यार्थी संबंध हे शालेय वातावरणाचे एक अविभाज्य अंग आहे. हे संबंध जेवढे मोकळे असतील, प्रेमाचे असतील तेवढे ते मुलांना शिक्षणाकडे आकर्षित करणारे ठरतात. दरारा, भीती, शिक्षा करणारे शिक्षक हे मुलांच्या लेखी राक्षस ठरतात. शिक्षकाने मुलांच्या स्तरावर उतरून त्यांचा मित्र व्हायचे असते.

- अलीकडे मेंदूसंशोधनात असे आढळून आले आहे की, सौम्य संगीताची सातत्याने साथ असणे हे भावनिक एकतानता साधणारे आणि बौद्धिक एकाग्रता साधणारे ठरते. संगीत हे मेंदूच्यामध्ये सातत्याने चालणाऱ्या पेशी बांधणीस अधिक बळकट करीत असते.

- शाळेत बदल कसा करायचा हे आपण शिकलो तर बदललेल्या शाळेत मुले उत्तम रीतीने शिकतील.

१) ग्राममंगलची शिक्षणविषयक पुस्तके

१. लहान मुलांच्या पालकांसाठी – रमेश पानसे

२. लहान मुलांच्या शिक्षिकांसाठी – रमेश पानसे

३. मुलांचे वालचंद – ताराबाई मोडक

४. वटवृक्षाच्या छायेखाली – सिंधुताई अंबिके

५. वाचन, लेखन कार्यक्रम १० पुस्तिकांचा संच – ग्राममंगल कार्यकर्ते

६. हिरवी झाडे निळे आकाश काळी माती – रमेश पानसे

७. रचनावादी शिक्षण – रमेश पानसे

८. प्रकल्प पद्धती – अदिती नातु

९. लहान मुलांच्या भाषा विकासासाठी गोष्टींची पुस्तके

२) बालवाडी ते इयत्ता चौथीपर्यंतची शैक्षणिक साधने व स्वयंअध्ययन साहित्य.

३) शिक्षक प्रशिक्षणासाठी उपयुक्त हस्तपुस्तिका व व्हिडीओ सी.डी.

# ग्राममंगलद्वारा देण्यात येणारी प्रशिक्षणे

१. एक वर्ष मुदतीचे बालसेविका प्रशिक्षण
२. एक वर्ष मुदतीचे विकासवाडी कार्यकर्ता प्रशिक्षण
३. बालवाडी शिक्षकांसाठी १० दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण
४. प्राथमिक शाळेतील शिक्षकांसाठी १० दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण
५. बालवाडी शिक्षकांसाठी प्रगत प्रशिक्षण
६. प्राथमिक शिक्षकांसाठी प्रगत प्रशिक्षण
७. प्राथमिक शिक्षकांसाठी विषय कार्यशाळा – भाषा, गणित, भूगोल, परिसर अभ्यास
८. बालवाडी शिक्षकांसाठी विषय कार्यशाळा – भाषा, गणित, परिसर अभ्यास, कलानुभव, कथा, बालगीते.

शाळांसाठी दीड वर्षात ३२ दिवस मुदतीचा शैक्षणिक सल्ला कार्यक्रम.

# बालशिक्षणाची उद्दिष्ट्ये

- बालकाच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक, कलात्मक विकासाचा पाया घालणे, त्यासाठी पोषक वातावरण उपलब्ध करून देणे.

- वैयक्तीक व सामाजिक आरोग्य, आहार व वर्तनाच्या चांगल्या सवयींचे बीजारोपण करणे, त्यासाठी योग्य अनुभव देणे.

- मुलांमध्ये उपजत असलेल्या ज्ञानप्राप्तीच्या लालसेचे पोषण करणे, शिकवण्यापेक्षा मुलांना शिकण्यासाठी अभिमुख करणे.

- मुलांच्या कृतिशीलतेचा, कार्यशक्तीचा विकास बहुतेक उपक्रमांतून साधण्याची संधी उपलब्ध करून देणे.

- व्यक्तिगत व सामाजिक जीवनासाठी आवश्यक अशा मूल्यांची जोपासना करणे.

- बालकांमधील विविध बुद्धिमतांचा शोध घेणे.

# ग्राममंगल


प्रकल्प : स्नेहनगरी, ऐना, ता. डहाणू,
जि. ठाणे - ४०१६०७
अनुताई वाघ शिक्षण केंद्र,
विक्रमगड,
ता. विक्रमगड,
जि. ठाणे - ४०१६०७.

कार्यलय : जय बिल्डिंग, उदय सिनेमा रोड,
घाटकोपर (प), मुंबई ४०००८६.
फोन : ०२२-५१४८३९६ /
५१४९१०२

ग्राममंगल, गांधीभवन परिसर,
पुणे मुलींच्या अंध शाळेशेजारी,
कोथरूड, पुणे - ४११०३८.
फोन - ०२० - २५३८६६८७



देणगी मूल्य : २० रूपये



© ग्राममंगल